
REVIEW OF RESEARCH
IMPACT FACTOR : 5.2331 (UIF) UGC APPROVED JOURNAL NO. 48514 ISSN: 2249-894X
VOLUME - 7 | ISSUE - 7 | APRIL - 2018

# १९९० नंतरच्या राजकीय परिस्थितीचे समकालीन मराठी कादंबरीतून आलेले चित्रण




डॉ. दिलीप यू. काकडे
एस. एस. जायस्वाल महाविद्यालय , अर्जुनी मोरगाव जि. गोंदिया.

## प्रस्तावना

राजकीय परिस्थिती आणि मराठी कादंबरीतील त्याचे प्रतिबिंब या संदर्भात दिगंबर पाध्ये यांनी राजकीय परिस्थिती या शब्दप्रयोगाची व्याप्ती सांगताना दोन माणसांचा संबंध येतो त्या त्या ठिकाणी सत्तासंघर्ष अटळपणे येतो. इथपासून ते राज्याच्या होणाऱ्या स्वातंत्र्यलढ्याच्या काळात झालेल्या चळवळी या सर्व संघर्षाला राजकारण असेच म्हटले जात होते. परंतु स्वातंत्र्योत्तर काळात राजकारणाचा अर्थ अधिक गुंतागुंतीचा झाला असे ते म्हणतात. आजच्या आधुनिक काळात अर्थकारण, समाजकारण, राजकारण ही अंग एकमेकात इतकी मिसळून गेली आहेत की, त्यांना वेगळी स्वतंत्र क्षेत्रे मानण्यापेक्षा एकंदर सामाजिक व्यवहाराकडे पाहण्याचे ते दृष्टीकोन आहेत असे म्हणावेसे वाटते. याचाच अर्थ राजकारणाने संस्कारित नाही असे आज जीवनाचे कोणतेही क्षेत्र नाही. १९९० नंतर जागतिकीकरणाचे धोरण स्वीकारण्यात राजकीय भूमिकाच महत्त्वाची होती. सुरुवातीला आशादायी चित्र निर्माण करणारे व बदलत्या परिस्थितीनुरुप बदलणारे राजकारणी, वाढलेली स्वार्थी प्रवृत्ती, बोकाळलेला भ्रष्टाचार या परिस्थितीची १९९० नंतरच्या कादंबरीकारांनी घेतलेली दखल व त्यांनी मांडलेले आकलन राजकारणातील वास्तवतेवर प्रकाश टाकणारे आहे.

**'पांगिरा'** या विश्वास पाटील यांच्या १९९० मध्ये प्रकाशित झालेल्या कादंबरीतून राजकारणामुळे गावोगावी वाढलेल्या सत्तास्पर्धा, निवडणुकांचा राक्षस थैमान घालू लागला. गावोगावी द्वेषाची आग भडकू लागली व लोकशाहीतून नवी घराणी जन्माला आली. माझ्यानंतर माझा मुलगा, तो नसेल तर माझा जावई, तो नसेल तर पुतण्या एवढाच समाजवादी समाजरचनेचा अर्थ प्रत्येक लावायला लागला. त्यामुळे सामान्य माणूस भरडल्या जात असल्याने चित्रण या कादंबरीतून आले. तर **'झाडाझडती'** या विश्वास पाटील यांच्या कादंबरीचा विषय धरणग्रस्तांचा परंतु धरणाच्या जागेचा निर्णय मुळात राजकीय असल्यामुळे हे चित्रण म्हणावे लागते. धरणग्रस्त गावातील नानाप्रकारची माणसे, त्यांच्यातील गट, ताणतणाव, शिंगाडे पाटलाचे राजकारण, धरणग्रस्तांना दिलेली आश्वासने, त्याची न होणारी पूर्तता, स्वार्थी प्रवृत्तीमुळेसामान्य माणसांच्या जगण्याची होणारी परवड असा एक विस्तृत राजकीय पट ही कादंबरी उलगडते.'**धिंगाना**' या राजन गवस यांच्या १९९५ ला प्रकाशित झालेल्या कादंबरीतून स्वातंत्र्यपूर्व काळात देशासाठी व देशाच्या स्वातंत्र्यांसाठी प्राणार्पण करणारे राजकीय, पुढारीही बदलले. वैयक्तिक स्वार्थ बोकाळला, राजकारणी आता सत्तांध, स्वार्थी झाले असून त्यापायी संबंध देशात धिंगाना घालायला सुरुवात केल्याचे वास्तव चित्र राजन गवस यांनी रेखाटले.

बाबाराव मुसळे यांच्या **'पखाल'** या कादंबरीतून आधुनिक विज्ञान तंत्रज्ञानाच्या रेट्यात पारंपरिक बलुतेदारी कशी मोडकळीस येते याची चित्रण करताना राजकारण्यांच्या स्वार्थी व भ्रष्टाचारी प्रवृत्तीवर प्रकाश टाकला आहे. ''सामान्यांच्या भरोवशावर हे पुढारी मोठे बनतात, खुर्च्या मिळवतात. समाज जिथल्या तिथेच राहतो. आपल्या समाजाचा तरी कोणता कायापालट केला आपल्या इव्हायान? मेळावे, सभा, मोर्चे काढून आपलं वजन वाढविलं, गावाचा उपसरपंच झाला. पुढे सरपंच होईल, आणखी काय आमदार–कामदार असतात ते होईल, आपल्या जगण्यात काय फरक पडणार आहे.''[१] पुंज्यानी व्यक्त कलेल्या राजकारण विषयीच्या भावना राजकारणातील वास्तवतेवर प्रकाश टाकणारे आहेत. तर **'तहान'** या १९९८ ला प्रकाशित झालेल्या कादंबरीत देखील सदानंद देशमुखांनी पाणी टंचाईच्या पार्श्वभूमीवर धगधगत्या ग्रामीण वास्तवाचे भेदक चित्रण केले आहे. धनाजी काळपांडे पंचायत समिती सदस्य गावाच्या नावावर पैसा लुटतो.राजकारणाच्या घरात नाळाचे पाणी सान्यांना काही नाही हा प्रश्न लेखक विचारतो. 'नामुष्कीचे स्वागत' या कादंबरीत मत्र्यांना खूष करण्यासाठी स्त्रीप्रयोगही करण्याचे समर्थन केल्या जाते. त्याबदल्यात फार मोठा फायदा पदरात पाडून घेणारे लोकही असल्याचे लेखक सांगतो. 'सेलझाडा' या कादंबरीतून नामदेव कांबळे यांनी गहू–सुपा या बलुतेदारांची आधुनिकीकरणाने झालेली वाताहन विचारताना ग्रामीण परिसरातील राजकारणावर प्रकाश टाकला आहे. ''राजकारणात काहीच सांगता

येत नाही. कोण केव्हा विरोधात जाईल ते सांगता येत नाही. विरोधातला माणूस केव्हा मांडीले मांडी लावून बसेल तेबी सांगता येत नाही.'' गावागावात राजकारण शिरल्याने निर्माण झालेला अविश्वास लेखक प्रगट करतो. गावातील साध्या सरपंचाच्या निवडनुकीकरिता होणारा पैशाचा व्यवहार हा आमच्या राजकारणात एक पैलू आहे. म्हणून सुपा म्हणतो ''राजकारण नासरासार्क आस्ते. नासवतच जाते माणसाले आन् कव्हा ना कव्हा नासरु झालेल्या भागाचा तोडा लागतो.'' बदलत्या राजकीय परिस्थितीचे गावगाड्यावर कसे विपरीत परिणाम झाले यावर लेखक प्रकाश टाकतो. 'बारोमास' या सदानंद देशमुख यांच्या २००२ मध्ये प्रकाशित झालेल्या कादंबरीतून लेखकाने स्वातंत्र्योत्तर काळातील भारतीय मूल्यहीन राजकीय व्यवस्था, भारतीय शासनतंत्र, भारतीय सांस्कृतिक मूल्यव्यवस्था, न्याय व्यवस्था, नव्या आर्थिक धोरणाच्या स्वीकारण्यासाठी राजकारणातील स्वार्थीपणावर प्रकाश टाकला आहे. तर शंकर सखाराम यांची **एसईझेड(सेझ)** ही कादंबरी राजकारण, भांडवलशाही, प्रशासन आणि दलाल वृत्तीच्या निष्ठुरतेचा वेध घेऊन उद्ध्वस्त होणाऱ्या भूमिपूत्राच्या भावविश्वाचा व आयुष्याचा संघर्षमय पट उभा करते. ''ग्लोबलायझेशनच्या काळात शहराशहरांमधून मॉल संस्कृतीचा विकास व्हायला लागला.राजकारणी व्यक्तीची सत्ताकांक्षा बळावली.स्वार्थ हा इथला परवलीचा शब्द झाला. शेतकऱ्यांवरही डोळा गेला आणि राज्याकर्त्यांबिरोबरच्या स्नेहपूर्ण संबंधांमुळे आपल्या उद्योगसमुहाचे कारखाने ठिकठिकाणी उभारुन मार्केट काबीज करण्याची स्वप्ने त्यांना पडू लागली.''

जागतिकीकरणाची शोषण परंपरा राजकारणाच्या सहकार्याने फोफावली असल्याचे भेदक वास्तव लेखकाने चित्रित केले. **'चाळेगत'** या प्रवीण दशरथ बांदेकर यांच्या २००९ मध्ये प्रकाशित झालेल्या कादंबरीतून नव्या आर्थिक धोरणाच्या परिणामानी शेतकऱ्यांसमोर निर्माण झालेले प्रश्न,मल्टीनॅशनल कंपनीच्या आगमनाने सर्वसामान्यांच्या जीवनावर होणारा परिणाम याचे चित्र रेखाटतांना या सर्व परिस्थितीच्या मागे राजकारण कसे जबाबदार आहे हे दाखवून दिले. राजकारणाच्या भरभराटीचे देवधर्म,मंदीर,मस्जित, जिहाद, चंगळवाद, राखीव कोटा, दहशत,बॉम्बस्फोट, खुनखराबा,पैसाचा वाटप अशा हाताला येतील त्या गोष्टी वापरुन वातावरण धगधगत ठेवायचं. या सर्व विचारप्रवाहात वाहत जाणारा तरुण आजच्या राजकारणाचे वास्तव आहे. राजकारण्यांची हमाली करणाऱ्या तरुण पिढीला प्रतिनिधी म्हणून मंग्या म्हणतो.उन्हातान्हातून सायकली दमया गावागावातून हिंडण, इलेक्शनच्या टायमाला तर काय बघायलाच नको.घरचा कर्तासवरता म्हातारा तिरडिवर पोहचला तरी त्याला उचलायला जायला सवड नाही. त्यामुळे आमच्या कॅंडिडेट केंद्रास मिनीस्टर आणि आम्ही मात्र इकडे कपभर चहासाठी सुद्धा ह्यांच्या त्याच्या गांडीला तेल लावत फिरतोय. स्वार्थासाठी राजकारण्यांनी बेकार तरुणांची केलेली अवस्था लेखकाने चित्रित केली आहे. रवींद्र शोभणे यांच्या **'पांढर'** या कादंबरीत देखील नव्या आर्थिक धोरणाचा निर्णय घेणारे शासन आता गप्प का? आत्महत्या करणारा शेतकरी,भकास उजेड झालेला गावगाडा, पाणी टंचाई हे सरळ मुकाटपणे पाहणारे शासन दलालाच्या स्वार्थाला जपणारे राजकारणी या वास्तवतेवर लेखकाने प्रकाश टाकला आहे. तर जी.के. ऐनापुरे यांच्या **'रिबोट'** या कादंबरीतून गिरणी मालकांना असणारे राजकारणाचे सहकार्य, त्यामुळे होणारे कामगारांचे हाल यावर प्रकाश टाकला आहे. **'ब्र'** या कविता महाजन यांच्या २००५ मध्ये प्रकाशित झालेल्या कादंबरीत स्त्रियांना राजकारणात आरक्षण मिळाले परंतु पुरुष नेतृत्वाला आपल्या अस्तित्वाची भिती वाटायला लागली, त्यामुळे राजकारणात स्त्रियांची होणारी कुचंबणा आजच्या बदललेल्या राजकारणाचा चेहरा उघड केला आहे. **'अंधाराचे वारसदार'** या कादंबरीतून दादासाहेब मोरे यांनी झोपडपट्टीतील बकाळपणावर प्रकाश टाकतांना आजच्या राजकारणाचा चेहरा उघड केला आहे. झोपडपट्टीतील गुंडांकरवी आग लावणं व दुसऱ्या दिवशी त्यांचे सांत्वन करण्याची व त्यांची पेपरमध्ये फोटो येण्याकरिता चढाओढ, भाषण, आश्वासनांचा पाऊस,लक्ष फक्त मतपेटीच्या राजकारणावर.. **'उठाव'** याकादंबरीतून लक्ष्मण गायकवाडांनी राजकारण्यांनी शाळा, महाविद्यालयाचा केलेला व्यापार यावर प्रकाश टाकला तर **'तनकट'** या कादंबरीतून कागदी प्रसिद्धीच्या आधुनिक तंत्रातून निर्माण झालेल्या बेगडी नेतृत्वाची निरंकुश सत्तालोपता गवस यांनी दाहक पणे चित्रित केलेले आहे. **'सर्वप्रश्न अनिवार्य'** या कादंबरीतून उत्रादकर यांनी अलिकडे शिक्षणाच्या झाडलेल्या बाजारीकरणातील राजकारणांच्या स्वार्थी भूमिकेवर प्रकाश टाकला. आपल्या सत्तेचा गैरवापर करून आपल्या नातेवाईकांना शिक्षणातील फायदे गैरमार्गाने मिळवून देणारे राजकारणी व त्यांची मजुरी चित्रित केलेली आहे. तर **'पडझड'** या कादंबरीतून अशोक पवार यांनी वडार जमातीच्या भटकंतीचे चित्र रेखाटत या परिस्थितीला जबाबदार राजकारण कसे आहे हे सांगितले आहे. एकनाथ साळवे यांच्या **'एनकांऊटर'** या कादंबरीत बिज्जू या माडिया आदिवासींच्या कुटुंबाची कहाणी आहे. नक्षलवादाविरुद्ध आघाडी उघडणाऱ्या शासन यंत्रणेची दमनशक्ती किती प्रभावी असते याचे चित्रण आले आहे.

एकूणच १९९० नंतरच्या कादंबऱ्यामधून राजकीय परिस्थितीचा आलेख अशा पद्धतीने चितारल्याचे दिसते. राजकारणातील आपल्या अवतीभवतीची राजकीय परिस्थिती व लेखकांनी मांडलेले वास्तव याचा विचार केल्यास कादंबरीकार खऱ्या अर्थाने समाजाचा भाष्यकार असतो. या विधानाला बळ प्राप्त होते. या संदर्भात लोकमत वृत्तपत्रातील 'राजकारण —बदलाचे नवे वारे' या मथळ्याखाली प्रसिद्ध झालेला अग्रलेख सद्य:स्थितील राजकीय परिस्थितीवर प्रकाश टाकणारा आहे. ''राजकीय पक्ष हे भ्रष्टाचाराचे जाळे वाटू लागला आहे. विविध घोटाळ्यांमुळे तीन गोष्टी स्पष्ट झाल्या आहेत. पहिली ही भ्रष्टाचाराला पक्षीय बंधने नाहीत,दुसरी

भ्रष्टाचार ही सहज प्रवृत्ती असून राजकारणाचा तो भाग बनला आहे. तिसरी भ्रष्टाचारात सुधारणा घडवून आणण्यासठी कायदा होणार नाही याची काळजी सर्व राजकीय पक्षांनी घेतले आहे.''

हे विधान कादंबऱ्यांमधून आलेल्या राजकीय परिस्थितीवर पुरेशा प्रमाणात प्रकाश टाकणारे आहे.एकूणच जागतिकीकरणाच्या बदलत्या परिस्थितीत शोषण परंपरा निर्माण करायला हातभार लावणाऱ्या राजकारणांचे चित्र बहुतेक कादंबरी लेखकांनी अधोरेखित केले. स्वत:च्या स्वार्थासाठी कोणत्याही पातळीवर जाणारी मानसिकता,त्यातून वाढलेला भ्रष्टाचार बेकारांच्या हाताला काम देण्याऐवजी राजकारणासाठी त्याचा होणारा वापर, गुंड प्रवृत्ती, दंगली, मत विकत घेणारी वाढणारी प्रवृत्ती, मतदानासाठी दारुचा पूर व ह्या सगळ्या खटपटी करून आल्यावर सामान्यांना देण्यात येणारी कोरडी आश्वासने, हाती आलेल्या सत्तेतून सामान्यांचा वाटा ओरबडून घेत गडगंज संपत्तीचे धनी झालेले राजकारणी यांचे वास्तव चित्रण १९९० नंतरच्या कादंबऱ्यामधून अत्यंत भेदकपणे आल्याचे ठामपणे म्हणता येते.

## संदर्भ टिपा :–


१) 'पखाल' बाबाराव मुसळे,बजाज पब्लिकेशन,अमरावती द्वि.आ.२०१२ पृष्ठ क्र.४०

२) 'सेलझाडा' नावदेव च.कांबळे,देशमुख आणि कंपनी (पब्लीशर्स)प्र.आ.२००१,पृष्ठ क्र. २६१

३) तत्रैव,पृष्ठ क्र. २७६

४) 'एसईझेड'(सेझ) संपा. धनाजी गुरव, शब्दालय प्रकाशन श्रीरामपूर, प्र .आ.२००९ पृष्ठ क्र. १४

५) 'चाळेगत', प्रवीण दशरथ बांदेकर, शब्दालय प्रकाशन श्रीरामपूर, प्र.आ.२००९ पृष्ठ क्र. १६५,१६६

६) दैनिक लोकमत,अग्रलेख,राजकारण व बदलाचे नवे वारे दि.६ ऑक्टोबर २०१२